प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सन २०१८-१९ मध्ये वितरित केलेल्या निधीच्या अनुषंगाने कोल्हापूर जिल्ह्यातील "(१) खिद्रापूर, ता. शिरोळ येथील कोपेश्वर मंदिर येथे नदीघाट बांधणे व (२) अब्दुललाट, ता. शिरोळ श्री दत्त मंदिर येथे नदीघाट बांधणे " या कामांच्या कार्यान्वयीन यंत्रणेत बदल करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक टिडीएस २०१९/७/प्र.क्र.४५६/ पर्यटन,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ९ ऑगस्ट, २०१९.

संदर्भ : १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. बैठक २०१८/२/प्र.क्र.११५३ / कोल्हापूर/ पर्यटन, दि.१८/२/२०१९.
२) जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर यांचे पत्र क्र. नियोजन/कार्या-१८/ पर्यटन/शिरोळ/१४१२/२०१९, दि.७/६/२०१९.

शासन निर्णय :

संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये कोल्हापूर जिल्ह्यातील "(१) खिद्रापूर, ता. शिरोळ येथील कोपेश्वर मंदिर येथे नदीघाट बांधणे व (२) अब्दुललाट, ता. शिरोळ श्री दत्त मंदिर येथे नदीघाट बांधणे " या दोन्ही कामांसाठी अनुक्रमे रु.१२७.०० लक्ष व रु.४०.०० लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता देऊन सदर दोन्ही कामांसाठी अनुक्रमे रु.१२.०० लक्ष व रु.४.०० लक्ष निधी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना वितरीत करण्यात आला आहे. सदर दोन्ही कामांसाठी शासन निर्णयामध्ये कार्यान्वयीन यंत्रणा कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर अशी दर्शविण्यात आली आहे.

२. आता संदर्भ क्रमांक २ येथील पत्रान्वये जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर यांनी केलेल्या विनंतीस अनुलक्षून संदर्भ क्रमांक १ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातील "(१) खिद्रापूर, ता. शिरोळ येथील कोपेश्वर मंदिर येथे नदीघाट बांधणे व (२) अब्दुललाट, ता. शिरोळ श्री दत्त मंदिर येथे नदीघाट बांधणे " **या दोन्ही कामांच्या कार्यान्वयीन यंत्रणेमध्ये "कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, कोल्हापूर" ऐवजी "कार्यकारी अभियंता, लघुसिंचन (जलसंधारण) विभाग, कोल्हापूर" असा बदल करण्यास शासन मंजुरी देत आहे.**

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०९१५२५०९६१२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Ramesh Jayaram Kadam
Date: 2019.08.09 15:30:15 +05'30'

(र.ज.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
२. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरिक्षा व लेखा), मुंबई.
३. प्रधान सचिव,जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.

४. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, कोल्हापूर.
५. जिल्हा नियोजन अधिकारी, कोल्हापूर.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, कोल्हापूर.
७. नियोजन विभाग (कार्यासन-१४११/१४४४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (का.व्यय-१५/अर्थोपाय/अर्थसंकल्प) मंत्रालय, मुंबई.
९. अवर सचिव पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (अर्थसंकल्प), मंत्रालय, मुंबई.
१०. निवड नस्ती/ पर्यटन.

***